# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ / फाल्गुन २२, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

---

### शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर व सोलापूर येथे टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरिंग पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(१) * १७५८७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने महाराष्ट्रात शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर व सोलापुर येथे टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरिंग पदविका अभ्यासक्रम सुरु केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जगप्रसिध्द असलेल्या सोलापुर टेक्सटाईल उद्योगाला उपयुक्त मनुष्यबळ पुरविणारा शासकीय तंत्रनिकेतन, सोलापुर येथील टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरिंग पदविका अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९७६ पासून शेकडो विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन उत्तम करिअर मिळवले असतानाही स्थानिक गरज लक्षात न घेता टेक्स्टाईल मॅन्युफॅक्चरिग पदविका अभ्यासक्रम बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने टेक्सटाईल विषयावर एकापेक्षा अधिक अभ्यासक्रम सुरु करणे गरजेचे असताना संबंधित अभ्यासक्रम पुन्हा सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर या संस्थेतील वस्त्रनिर्माण अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ४० आहे. त्यापैकी सन २०१५-१६ मध्ये १८, सन २०१६-१७ मध्ये १९, सन २०१७-१८ मध्ये ०८, सन २०१८-१९ मध्ये ०३, सन २०१९-२० मध्ये ०४ अशा प्रकारे विद्यार्थी प्रवेश सातत्याने कमी झाल्यामुळे तंत्र शिक्षण संचालनालयाच्या शिफारशीनुसार सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यात आलेला आहे.

(४) शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथील स्थानिक उद्योजकांशी चर्चा करून तीन महिने कालावधीचे गारमेंट मॅन्युफॅक्चरींग व मॉडर्न शटरलेस विव्हींग हे दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

त्यापैकी गारमेंट मॅन्युफॅक्चरींग हा तीन महिन्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेमध्ये सीडीटीपी या योजनेंतर्गत दिनांक १५/११/२०२२ पासून सुरू करण्यात आलेला आहे. तसेच मॉडर्न शटरलेस विव्हींग हा अभ्यासक्रम मार्च, २०२३ मध्ये सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नक्षलग्रस्त भागातील नगरपरिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार नक्षलग्रस्त भत्ता मिळण्याबाबत

**(२) * १७१३६ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नक्षलग्रस्त भागातील नगरपरिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार नक्षलग्रस्त भत्ता मिळत असून तो सातव्या वेतन आयोगानुसार मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील नक्षलग्रस्त भागातील नगरपरिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार नक्षलग्रस्त भत्ता मिळत आहे तो सातव्या वेतन आयोगानुसार मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) सामान्य प्रशासन विभागामार्फत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचा साधक बाधक विचार करुन राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात सेवारत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय करावयाच्या सुधारित सवलतींबाबत सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात येतील. त्यानंतर नक्षलग्रस्त /आदिवासी भागात काम करणाऱ्या मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक/ माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग कनिष्ठ महाविद्यालय व सैनिकी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शालेय पोषण आहार योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत

**(३) * १७७०२ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार योजना राबविली जात असून विद्यार्थ्यांना पोषण आहारात खिचडीसह मुगाच्या डाळीची आमटी आणि हरभरा, तूर डाळ, तांदूळ, मुग डाळ, मसुर डाळ, वाटाणा, मटकी, चवळीचे वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या काही महिन्यांपासून मुगाच्या डाळीची आमटी, चवळी, हरभरा व तूरडाळ सततच्या खाण्यामुळे वेगळा आहार मिळावा अशी विद्यार्थ्यांनी शासनाकडे मागणी केली असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांमध्ये शालेय पोषण आहाराचा पुरवठा मागील एक महिन्यापासून बंद असल्याने शाळांमध्ये खिचडी दिली जात नसल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इंधन, भाजीपाला व पुरक आहारासाठी प्रति विद्यार्थी अनुदान वितरित करण्यात येत असून सुधारित अनुदानात ९.६ टक्के वाढ करण्यात आली आहे, बहुतांश शाळांमध्ये शालेय पोषण आहार निधी शासनाने जमा न केल्याने तसेच माहे जून, २०२२ पासून तेल, भाजीपाला यांचे पैसे न आल्याने मुख्याध्यापकांना पदरचे पैसे भरावे लागत आहेत, तसेच स्वयंपाकी व मदतनीस मानधन थकीत असून त्यांना फक्त रुपये १५००/- प्रति महिना मानधन देण्यात येत असून किमान रुपये ५०००/- प्रति महिना मानधन करण्यासाठी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नगरपरिषदेच्या शाळांमधील पोषण आहाराचा पुरवठा बचत गटांकडून सुरु असून तेथे कोणतीही अडचण नाही त्याच धर्तीवर जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमध्ये महिला बचत गटांकडून पोषण आहाराचा पुरवठा बचत गटाकडून करण्यात यावा अशी मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारांतर्गत वारनिहाय शासनाने निर्धारित केलेला पौष्टिक आहार देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे, यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये बंद असलेला शालेय पोषण आहार पुरवठा पूर्ववत करणे, स्वयंपाकी व मदतनीस यांचे थकीत मानधन देणे व वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरप्रमाणे मागणी आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्चाच्या दरामध्ये ९.६ टक्के दरवाढ करण्यात आली आहे. तसेच, प्रस्तुत योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन माहे जानेवारी, २०२३ इंधन व भाजीपाला अनुदान माहे नोव्हेंबर, २०२२ व खाद्यतेलाचे अनुदान माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन वितरीत केले आहे.

योजनेंर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनामध्ये रुपये १०००/- इतकी प्रति माह वाढ करुन रुपये २५००/- इतके मानधन एप्रिल, २०२३ पासून अदा करण्याचा शासन निर्णय दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित केला आहे.

(५) सदरप्रमाणे निवेदन आढळून येत नाही.

(६) केंद्र शासनाकडून केंद्र हिस्स्याचा निधी प्राप्त झाल्यानंतर केंद्र व राज्य हिस्स्याचा एकत्रित निधी तात्काळ क्षेत्रिय यंत्रणेस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. उर्वरित निधीसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हजारो शाळांना वीजदेयके भरण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन वीजपुरवठा पूर्ववत करण्याबाबत

**(४) * १७०२५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.अंबादास दानवे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.एकनाथराव खडसे, श्री.किशोर दराडे, श्री.जयंत पाटील, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांचे डिजिटलायझेशन करण्यात येत असून ९२६२ शासकीय शाळा वीजेअभावी अंधारात असून थकीत वीज देयकांमुळे ६७३२ शाळांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे तर २५३० शाळांचे वीज मीटर काढण्यात आले असून थकित वीज देयकाची रक्कम २४ कोटी २१ लाख ५८ हजार ३९३ रुपये असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकित देयकापोटी शाळांचा वीजपुरवठा खंडीत करु नये तसेच शाळेतील वीज मीटर लावलेली भिंत जीर्ण झाली किंवा पडली असेल अशा स्थितीत वीज मीटर काढण्यांत यावेत अशा सूचना जिल्हास्तरावरील संबंधित विद्युत वितरण कंपनी अधिकाऱ्यांना शासनाने दिल्या असूनही जळगाव जिल्ह्यातील २४९ जिल्हा परिषद शाळांची वीज देयके थकित असल्याने वीज मीटर विद्युत वितरण कंपनीने काढून नेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी अनुदानित ८००० माध्यमिक शाळांमध्ये केंद्रशासन पुरस्कृत आयसिटी योजनेंतर्गत प्रत्येकी १८ लक्ष रुपये याप्रमाणे १४४० कोटी रुपये किंमतीच्या संगणक प्रयोगशाळा दिल्या असून बहुतांश संगणक प्रयोगशाळा जास्त येणाऱ्या वीज देयकामुळे बंद असल्याने विद्यार्थी संगणकीय शिक्षणापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वीजेची साधनसामग्री उभारण्यासाठी, वीज जोडणी करण्यासाठी शाळांना शासन अनुदान मिळत असून जिल्हा परिषद शाळांना सादील अनुदानापोटी विशिष्ट रक्कम देण्यात येते मात्र वीज देयक भरण्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याने जिल्हा परिषदेकडून मिळणाऱ्या अनुदानावरच वीज भरणा करावा लागत असून शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापकांना आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वीज नसलेल्या सर्वाधिक शाळा मराठवाडा व विदर्भातील असल्याने खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना मोफत अथवा स्वस्त दरात वीज उपलब्ध करून मिळावी याबाबत शासनाकडे वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपेक्षित भागातील विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान शिकविण्याच्या दृष्टीने तसेच या सर्व शाळांची वीजेची देयके भरण्यासाठी शासनाकडून विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत व वीजेची देयके तात्काळ अदा करून या शाळांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेल्या ११८३५ व तात्पुरते वीज पुरवठा खंडीत केलेल्या ५५२० जिल्हा परिषद शाळांचे एकूण १६,२७,७९,२१६/- इतक्या रकमेचे देयक थकीत होते. त्यापैकी रुपये १४,१८,१६,१९०/- इतके थकीत वीज देयक अदा करण्यात आले असून, रुपये २,०९,६३,०३६/- इतके वीज देयक अदा करणे शिल्लक आहे.

जळगांव जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची विज देयके थकीत असल्याचे कारणास्तव, २३९ शाळांची वीज मीटर काढून नेले आहेत.

जळगांव जिल्ह्यातील १८६५ जिल्हा परिषद शाळांचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यासाठी समग्र शिक्षण अभियानअंतर्गत रुपये ३,१३,८२,५००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ४ जून, २०२० अन्वये, ४ टक्के सादिल अनुदानाच्या रकमेतून, वीज बील (रुपये १०००/- प्रति शाळा प्रति महिना या मर्यादेत) इतर निधीतून वीज बील भरले नसल्यास खर्च भागविण्याकरीता अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार, सन २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद शाळांचे वीज देयके अदा करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच, सन २०२२-२३ या वर्षात जिल्हा परिषद शाळांचे थकीत वीज देयके अदा करण्यासाठी सादिल अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक २६/६/२०१५ च्या आदेशान्वये शासकीय सेवा या वर्गवारीमध्ये दोन प्रवर्ग निर्माण केले असून, शासकीय शैक्षणिक संस्थांना " सार्वजनिक सेवा-अ"

व इतर शैक्षणिक संस्थांना "सार्वजनिक सेवा-ब" या वर्गवारीनुसार वीज दर आकारणी करण्यात येत आहे.

खाजगी अनुदानित शाळांना किरकोळ खर्च भागविण्यासाठी वेतनेत्तर अनुदान मंजूर करण्यात येते. त्यामधून वीज देयकाची देयके अदा करण्यात येतात.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) * १७७१५ श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अरुण लाड, श्री.किरण सरनाईक, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांमध्ये शिक्षकांची १० टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त असू नयेत असा नियम असतानाही बहुतांश शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची ६७ हजार ७५५ रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तांकडून विभागाकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यात विशेषत: वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शिक्षकांची ७०० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव आर्थिक भाराचे कारण देऊन प्रलंबित ठेवण्यात आला असल्यामुळे शिक्षण क्षेत्रातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, तसेच जुन्या पेंशनसाठी शालेय कर्मचाऱ्यांचा मागील अनेक वर्षांपासून लढा सुरु आहे, मात्र शासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया बंद तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन रिक्त पदे भरण्याबाबत तसेच शालेय कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त माहितीच्या आधारे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत राज्यातील वर्धा जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षकांची २४१ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कार्यरत शिक्षकांकडून आवश्यक अध्यापनाचे कामकाज पूर्ण करुन घेण्यात येत आहे. तसेच शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीचे दिनांक २२ फेब्रवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकांची पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची वेतनवाढ अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(६) * १७०६७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीच्या संदर्भांत मा.सर्वोच्च न्यायालयाने समान काम, समान वेतन या नियमाप्रमाणे कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांप्रमाणे पगार देण्याचे निर्देश दिले असतानाही विद्यापीठ प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कार्यपदानुसार वेतनवाढीला पाच महिन्यांपूर्वी पार पडलेल्या सिनेटच्या शेवटच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली असतानाही अद्यापपर्यंत विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली नसल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शानास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठातील कर्मचाऱ्यांमध्ये कायमस्वरुपी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा कंत्राटी स्वरुपातील कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असूनही मागील अनेक वर्षांपासून त्यांची तुटपूंज्या पगारावर नियुक्ती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी एजन्सीकडून नेमण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांचा पगार आणि कंत्राटी व रोजंदारी पध्दतीवर गेल्या १५ ते २० वर्षांपासून काम करित असलेल्या सुरक्षा रक्षकांचा पगार यात तफावत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार वेतन मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २६/०७/२०२२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार विद्यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०७/२०२२ पासून किमान वेतनश्रेणीनुसार मूळ वेतन देण्यात येत आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हंगामी स्वरूपात कार्यरत सुरक्षा रक्षकांना किमान वेतनश्रेणीनुसार मूळ वेतन अदा करण्यात येत आहे. तसेच सुरक्षा रक्षक मंडळामार्फत नियुक्त सुरक्षा रक्षकांना संबंधित मंडळाने ठरविलेल्या वेतन व भत्यानुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

(५) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विद्यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांना किमान वेतनश्रेणीनुसार मूळ वेतन देण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तोरणमाळ (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळेतील शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(७) * १७८०४ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे याकरिता अतिदुर्गम भागात सर्व सोयीयुक्त भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, तोरणमाळ (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे सन २०१९ मध्ये सुरू केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेतील १६०० विद्यार्थी पटसंख्येसाठी शासन नियमान्वये मुख्याध्यापकांसह एकूण ५४ शिक्षकांची आवश्यकता असताना आतापर्यंत केवळ २६ उप शिक्षकांची नेमणूक करण्यात आली असून मुख्याध्यापकांसह पदवीधर शिक्षकांची २२, क्रीडा शिक्षकांची २, कला शिक्षकांची २ आणि कार्यानुभव शिक्षकाचे १ पद रिक्त आहे, तसेच या शाळेत गणित आणि विज्ञानाचे शिक्षकच नसल्याने जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक दहावीच्या मुलांनाही शिक्षण देत आहेत त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे कंत्राटीपध्दतीने बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत जिल्हा परिषद स्तरावरुन भरण्यात आली असून शिक्षकेतर कर्मचारी प्रत्यक्षात शाळेमध्ये सेवा देत नसतानाही त्यांचे वेतन अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातपुडा या अतिदुर्गम भागात अनेक गावापर्यंत रस्ते नाहीत, त्यातच सरदार सरोवरच्या पाणलोटाचे पाणी सातपुड्यातील अनेक डोंगरांमध्ये शिरल्याने दळणवळणाचे साधन नसल्याने, या डोंगरदऱ्यातील गावापर्यंत शाळा पोचल्या असल्या तरी शाळेत जाण्यासाठी तीन ते सात किलोमीटर पायपीट करावी लागते तर कुठे बोटीने जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागत असल्याने अनेक विद्यार्थी शाळाबाह्य आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त शाळेतील रिक्त असलेली सर्व पदे भरण्याबाबत व सर्व विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत, कोणती कार्यवाही केली तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रत्यक्षात शाळेमध्ये सेवा देत नसतानाही त्यांचे वेतन अदा करण्यात येत असलेल्या या अनियमिततेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) हे, खरे नाही.
(५) तोरणमाळ येथील समायोजित झालेल्या १८ शाळांमधील २९ शिक्षक व निवड झालेले १ शिक्षक असे एकूण ३० शिक्षक सद्य:स्थितीत कार्यरत असून जिल्ह्यातील १०० टक्के अनुदानित खाजगी शाळा, नगरपालिका व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना स्वेच्छेने आंतरराष्ट्रीय शाळा तोरणमाळ (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे कामकाज करणेबाबत कळविण्यात आले आहे. समग्र शिक्षा IEDSS (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांना इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आले आहे. विषय निहाय शिक्षक मागणीचा प्रस्तावाच्या अनुषंगाने पदे भरण्याबाबत शासनाची तजवीज आहे
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे देगांव (ता.जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे शिक्के उठविणेबाबत

**(८) * १७४०४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगांव (ता.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी औद्योगिक वसाहतीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनी संपादनानंतर महामंडळाकडून जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर शिक्के मारण्यात आल्यामुळे संबंधित सर्व शेतकऱ्यांना आर्थिक व्यवहार करताना बँक कर्जे व इतर बाबींसाठी अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतकरी हे अल्पभूधारक असल्याने व शेती हेच त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन असल्याने त्यांचे जमिनीवरील ७/१२ उताराऱ्यावर महामंडळाकडून मारण्यात आलेले शिक्के उठविण्याची अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी करण्यात येऊनही त्याबाबत अद्याप कार्यवाही न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार ७/१२ च्या उताऱ्यावर शासनाने मारलेले शिक्के उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे देगांव, ता.सातारा येथील जमिनी संपादीत करणेसाठी ३५२.३१ हे.आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६ च्या तरतुदी दिनांक ०४/०६/२००९ रोजी लागु करण्यात आल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

नियोजित औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ ची कलम ३२(१) ची अधिसूचना प्रसिध्द झाल्याशिवाय शासनाचे कोणतेही निर्बंध येत नाहीत असा निकाल मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्र.३८००/२००८ मध्ये दिलेला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे दिनांक ०१/०२/२०१० रोजीचे परिपत्रक व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र.३८००/२००८ मध्ये दिनांक ११/०७/२००८ रोजीच्या दिलेल्या निर्णयानुसार शेतकऱ्यांना बँक कर्जे व अन्य प्रापंचिक कारणास्तव व्यवहार करण्यावर कोणतीही बंदी येत नाही.

(३) दिनांक २६/०६/२०२० रोजी भूमीपुत्र सेवाभावी शेतकरी संघटना, सातारा यांनी शेतकऱ्यांचा जमीन संपादनास तीव्र विरोध असल्याने सदरचे औद्योगिक क्षेत्र संपादन करू नये म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांना निवेदन दिलेले आहे.

(४) मौजे देगांव, ता.सातारा येथील संपादीत क्षेत्राची महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत दिनांक २६/०५/२०२२ रोजी स्थळपाहणी करण्यात आली आहे.

सदर भूनिवड समितीने स्थळपाहणी अहवालामध्ये सदरचे क्षेत्र डोंगर पायथ्याशी असून सौम्य उतार आहे. तसेच सदर क्षेत्रामध्ये ओढे, नाले, छोटया प्रमाणात पाझर तलाव असून नैसर्गिक वाढलेली झाडे आहेत.

तसेच सदर क्षेत्रास स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांचा विरोध असल्याने संपूर्ण क्षेत्र वगळणे उचित होईल असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुषंगाने मौजे देगांव येथील अधिसूचित खाजगी ३५२.३१ हे.आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्यास उच्चाधिकार समितीने दिनांक १४/०७/२०२२ रोजी तत्वत: मान्यता दिली असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ नुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हा ते झिरोफाटा (जि.परभणी) या राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या अपघातांबाबत

**(९) * १७१९७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १३८४० ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हा ते झिरो फाटा (जि.परभणी) या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वर ११३ जणांचा मृत्यू व २०० जणांना अपंगत्व आल्याबद्दल जिल्हाधिकारी,परभणी यांनी सन २०२२ दरम्यान फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश काढले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाच्या कालावधीत अपघाताची व मृत्यूची संपूर्ण जबाबदारी कामाच्या कलम १०.४ च्या करारनाम्यानुसार कंत्राटदाराची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघातास व मृत्यूस कारणीभूत असलेल्या मे.ग्यानान डंकर्ले ॲण्ड कंपनी व मे.मारे टेक्नोकेटस प्रा.लि. कंपनी यांच्याविरूध्द ११३ जणांचा मृत्यु व २०० जणांना अपंगत्वास कारणीभूत असल्याने त्यांच्यावर गुन्हे नोंदवून मयतांच्या कुटूंबियांस आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्य सचिव यांच्याकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव यांच्या स्तरावरून उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) कोल्हा ते झिरो फाटा (जि.परभणी) या राष्ट्रीय महामार्गावर सन २०१७ ते २०२१ दरम्यान ७० अपघात व ७१ मृत्यू झाले आहेत.

जिल्हाधिकारी परभणी यांनी माहे एप्रिल, २०२२ मध्ये राष्ट्रीय महामार्गाचे काम ७ जून, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेशित केले होते व काही अनुचित घटना घडल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत सदर आदेशामध्ये नमूद करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) या महामार्गावर झालेले अपघात हे बहुतांशी वाहनचालकाच्या चुकीमुळे व इतर कारणांमुळे झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. तसेच रस्त्याचे काम करताना कंत्राटदारानी रस्ता सुरक्षेच्या दृष्टिने आवश्यक उपाययोजना केल्या होत्या.त्यामुळे अनुचित घटना घडलेली नाही. कंत्राटदाराकडून सदर काम संथगतीने चालु असल्यामुळे त्यांना निर्धारीत उद्दीष्ट दिलेल्या मुदतीत पूर्ण न करता आल्यामुळे केंद्र शासनाने दिनांक ९/०३/२०२२ रोजी कंत्राट रद्द केले व कंत्राटदाराकडून रुपये १५.२४ कोटी एवढया रकमेची बँक गॅरंटी वसूल करुन शासनास जमा करण्यात आली आहे. उर्वरीत कामासाठी नवीन निविदा काढुन निविदा स्वीकृतीनंतर नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करुन काम सुरु करण्यात आले आहे. रस्ता सुरक्षेसाठी आवश्यक मार्गदर्शक फलक बसविणे, तात्पुरत्या स्वरुपातील वळण रस्ते काढणे इ. कामे पूर्ण केलेली आहेत. सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक वितरण प्रणालीतील ऑनलाईन शिधापत्रिका नोंदणी प्रक्रियेतील अडचणी दूर करणेबाबत

**(१०) * १७१६७ श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १२५५३ ला दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एनपीएच योजनेतील (प्राधान्य गटात न मोडणाऱ्या) २ लाख ६७ हजार कुटुंबांना म्हणजेच अंदाजे ९ लाख लोकसंख्या असणाऱ्या केशरी शिधापत्रिकाधारकांना धान्य उपलब्ध होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एनईआर अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य लाभांपासून वंचित ठेवण्यात आले असून प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी व अंत्योदय योजनेत लाभार्थी संख्या शिल्लक नसल्याने प्रलंबित शिधापत्रिकाधारकांना योजनेत समाविष्ट करण्यासाठी प्रयोजन नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिधापत्रिकाधारकांना योजनेत समाविष्ट केल्यानंतर प्रत्यक्ष अन्नधान्याचा लाभ मिळविण्यासाठी २ महिने प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कालावधी कमी करून शिधापत्रिका मिळताच धान्य देण्याची कार्यवाही व्हावी, शिधापत्रिकाधारकांचे आधार संलग्न करावे तसेच ऑनलाईन शिधापत्रिका नोंदणी कार्ड आरसीएमएस सिस्टीम प्रक्रियेतील अडचणी दूर करणे इ. बाबत लोकप्रतिनिधी यांनी लेखी तक्रार करुन निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने शिधापत्रिकाधारकांना अन्न धान्य मिळण्यासाठी तसेच ऑनलाईन शिधापत्रिका नोंदणी प्रक्रियेतील अडचणी दूर होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सद्य:स्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात येते. सदर अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना (Priority Households-PHH) अनुदानित अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. दिनांक १७/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे निकष विहीत करण्यात आले आहेत. सदर निकषांची पूर्तता करीत नसलेल्या शिधापत्रिकाधारकांना (Non Priority Households-NPH) अनुदानित अन्नधान्याचा लाभ अनुज्ञेय नाही.

(२) हे खरे नाही, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पातंर्गत संगणकीकृत केलेल्या शिधापत्रिकांतील पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रीक ओळख पटवून ई-पॉसद्वारे शिधावस्तूंचे वितरण करण्यात येते. सदर प्रणालीद्वारे धान्याचे वाटप करताना माहे ऑगस्ट, २०२० ते माहे डिसेंबर, २०२० या ५ महिने कालावधीमध्ये धान्याची उचल न केलेल्या ७.९५ लक्ष शिधापत्रिकांची क्षेत्रिय स्तरावर तपासणी करण्याचे आदेश दिनांक २५/०१/२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आले होते. त्याप्रमाणे तपासणी होईपर्यंत या शिधापत्रिका तात्पुरत्या स्वरुपात निलंबित करण्यात आल्या होत्या. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (Ration Card Management System - RCMS) मध्ये या निलंबित केलेल्या शिधापत्रिका “शिधाजिन्नस अनुज्ञेय नाही-Not Entitled for Ration (NER)” या प्रकारात वर्ग करण्यात आल्या होत्या. वरील ७,९५,१६८ शिधापत्रिकांपैकी ७,९४,९८९ एवढया शिधापत्रिका क्षेत्रिय स्तरावरील तपासणीअंती योग्य योजनेत वर्ग करण्यात आल्या आहेत. उर्वरित १७९ शिधापत्रिकांची क्षेत्रिय स्तरावर तपासणीची कार्यवाही सुरु आहे. माहे मे, २०२१ पासून NER प्रकारातील सर्व शिधापत्रिकांना प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे, शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) राज्यातील सर्व शिधापत्रिकांच्या ऑनलाईन नोंदी घेण्यात येतात. या प्रणालीमध्ये महिन्याच्या २० तारखेपर्यंत नोंद झालेल्या शिधापत्रिका Freeze करण्यात येतात व तद्नंतर जिल्हानिहाय धान्य वाटपाच्या परिमाणानुसार या शिधापत्रिकांसाठी नियतन देण्यात येते. या नियतनानुसार पुढील महिन्यात ई-पॉस उपकरणांवर धान्य अनुज्ञेय होते. महिन्याच्या २० तारखेनंतर नोंद झालेल्या शिधापत्रिकांना येणारा महिना सोडून त्या पुढील महिन्यामध्ये धान्य अनुज्ञेय होते. त्यामुळे नवीन समाविष्ट शिधापत्रिकाधारकाला प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी किमान १० ते कमाल ४०

दिवसांचा कालावधी लागतो. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) सध्या सुस्थितीत असून सुरळीत सुरु आहे.
(४) व (५) अंशत: खरे आहे, आरसीएमएस सिस्टीम प्रक्रियेतील अडचणी दूर करणेबाबत लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात आली असून त्याबाबत मा.विधानसभा सदस्य यांना दिनांक २७/०७/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील अन्न चाचणी व औषध नियंत्रण प्रयोगशाळांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * १७३०१ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५२३३ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील अन्न व औषध प्रशासनांतर्गत असलेल्या प्रयोगशाळेमध्ये अन्न चाचणी व औषध नियंत्रण अशा दोन प्रयोगशाळा कार्यरत असून या प्रयोगशाळांमध्ये दरमहा क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात अन्न नमुने व औषधी नमुने विश्लेषणाकरिता प्राप्त होत असून तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे औषधी नमुन्यांचे विश्लेषण विहित कालमर्यादेत करणे कठीण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विभागातील मंजूर ४१ पदांची पदभरती शासन लवकरात लवकर करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये आवश्यक असलेल्या विविध संवर्गातील नवीन पदे मंजूर करण्याकरिता उच्चस्तरीय सचिव समितीने शिफारस केली आहे, त्यानुसार राज्यातील १९७ पदांच्या मंजुरीच्या शासन निर्णयानुसार वरील पदभरती शासन करणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे अंशतः खरे आहे.
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, नागपूर येथे माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये ४५१ औषध नमुने प्राप्त झाले होते. त्यापैकी ३५० औषध नमुने विश्लेषित करण्यात आले असून १५५ नमुने माहे डिसेंबर, २०२२ अखेर प्रलंबित राहिलेले आहेत. तसेच माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये ४५८२ अन्न नमुने प्रयोगशाळेला प्राप्त झाले होते. त्यापैकी ४२६२ नमुने विश्लेषित करण्यात आले असून १०६९ अन्न नमुने माहे डिसेंबर, २०२२ अखेर प्रलंबित राहिलेले आहेत.
(२), (३) व (४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दिनांक ४/०९/२०२० अन्वये अन्न व औषध प्रशासनाच्या आस्थापनेवरील १२७१ पदांचा सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला असून, त्यामध्ये प्रशासनाकरिता एकूण १९७ नवीन पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये अन्न व

औषध प्रशासन प्रयोगशाळा, नागपूरकरिता विविध संवर्गातील ४१ नवीन पदे मंजूर करण्यात आली आहेत. अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, नागपूर येथील विविध संवर्गातील सद्य:स्थितीत रिक्त असलेली पदे पदोन्नतीने तसेच सरळसेवेने भरण्याची कार्यवाही विविध स्तरावर सुरु आहे. तसेच, तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता विचारात घेता, तांत्रिक मनुष्यबळाच्या सेवा कंत्राटी तत्वावर बाह्ययंत्रणेद्वारे तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेतल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गुटखा व पान मसाला या पदार्थांच्या उत्पादन, विक्री आणि वाहतुकीस बंदी असतानाही कंपन्यांना विक्रीचे परवाने दिल्याबाबत

**(१२) * १७६०२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १५१५३ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गुटखा व पान मसाला यांचे उत्पादन विक्री व वाहतुकीस बंदी असतानाही काही कंपन्यांना विक्रीचे परवाने देण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक दोषामुळे फूड कॅटेगरी क्रमांक १०० मधील पानमसाला या पदार्थासाठी परवाने मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये राज्यात पान मसाल्यासाठी परवाना/नोंदणी अनावधानाने मंजूर होवू नये यासाठी कोणती खबरदारीची उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, केंद्रीय परवाना प्राधिकारी, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, मुंबई यांनी फूड कॅटेगरी क्र.१०० मधील सब कॅटेगरीमध्ये पान मसाला हा शब्द वगळण्यासाठी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सन २०११ पासून गुटखा व पान मसाला यांचे उत्पादन विक्री व वाहतुकीस बंदी घातली असतानाही तांत्रिक दोषामुळे फूड कॅटेगरी क्रमांक १०० मधील पानमसाला या पदार्थासाठी महाराष्ट्र राज्यात त्यांचे कार्यक्षेत्रात मंजूर करण्यात आलेले अन्न परवाने/नोंदणी रद्द (Cancel) करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

FLRS to FoSCos मध्ये data transfer होताना तांत्रिक दोष (system) निर्माण होऊन नव्याने निर्माण करण्यात आलेल्या फूड कॅटेगरी क्रमांक १०० मधील सब कॅटेगरी मध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे काही परवाने तांत्रिक दोषाने मंजूर झाले आहेत. माहे ऑक्टोबर,२०२२ च्या सुमारास निदर्शनास आलेल्या

उपरोक्त बाबीच्या अनुषंगे संबंधित अधिकाऱ्यांनी फूड कॅटेगरी क्रमांक १०० अंतर्गत अशा प्रकारे मंजूर झालेले परवाने हे तात्काळ रद्द करून दुरुस्त (Modify) करण्यात आले आहेत.

(३) अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांना दिनांक २८/०२/२०२२ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र राज्यात पान मसाल्यासाठी परवाना/नोंदणी अनावधानाने मंजूर होवू नये यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून, फूड कॅटेगरी क्रमांक १०० मधील सब कॅटेगरी मध्ये पान मसाला हा शब्द वगळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) यासंदर्भात माहे ऑक्टोबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आलेल्या उपरोक्त बाबीच्या अनुषंगे संबंधित अधिकाऱ्यांनी फूड कॅटेगरी क्रमांक १०० अंतर्गत अशा प्रकारे मंजूर झालेले परवाने हे तात्काळ रद्द करून दुरुस्त (Modify) करण्यात आले आहेत. तसेच सदरचा तांत्रिक दोष हा यापूर्वीच अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास येताच दिनांक ०३/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अन्न व औषध प्रशासनातील सर्व सह आयुक्त (अन्न) व दिनांक ३१/०३/२०२२ च्या पत्रान्वये केंद्रीय परवाना प्राधिकारी, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, बांद्रा (पु), मुंबई यांना प्रतिबंधित अन्न पदार्थ उत्पादनासाठी महाराष्ट्र राज्यात त्यांचे कार्यक्षेत्रात मंजूर करण्यात आलेले अन्न परवाने/नोंदणी तात्काळ रद्द/दुरुस्त (Cancel/Modify) करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांना दिनांक २८/०२/२०२२ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र राज्यात पान मसाल्यासाठी परवाना/नोंदणी अनावधानाने मंजूर होवू नये यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून, फूड कॅटेगरी क्रमांक १०० मधील सब कॅटेगरी मध्ये पान मसाला हा शब्द वगळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत FoSCos या ऑनलाईन पोर्टलवर फूड कॅटेगरी क्रमांक १०० अंतर्गत परवाना/नोंदणी मंजूर करण्यात आलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेंद्रा (औरंगाबाद) एम.आय.डी.सी. विस्ताराकरिता मौजे जयपूर येथील संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(१३) * १७१०४ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंद्रा (औरंगाबाद) एम.आय.डी.सी. विस्ताराकरिता शेंद्रा लगत असलेल्या मौजे जयपूर येथील ६२० एकर जमिनीचे संपादन करण्यासाठी माहे जानेवारी, २०१८ मध्ये अधिसूचना काढण्यात आली असून, सदर अधिसूचनेनुसार जयपूर शिवारातील ११ हेक्टर शासकीय जमीन व १८१ हेक्टर खाजगी जमीन अशी एकूण १९२ हेक्टर जमीन प्रत्यक्ष संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना ७० लाख रुपये प्रति हेक्टरप्रमाणे जमिनीचा मावेजा दिला, परंतु तत्कालीन भूसंपादन अधिकाऱ्यांनी जमिनीचे मुल्यांकन करतांना शेतातील फळझाडे व घराचे मुल्यांकन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना फळझाडे व घराचा मावेजा न मिळाल्याने शेतकऱ्यांनी एम.आय.डी.सी.मार्फत करण्यात येत असलेली विकास कामे करण्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना फळझाडे व घराचा मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: हे खरे आहे.

मौजे जयपूर औद्योगिक क्षेत्रासाठी ११.३३ हे.आर सरकारी व २१५.८० हे.आर खाजगी क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करण्याबाबतची अधिसूचना दिनांक ३०/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने कलम ३२(२) अन्वये संयुक्त मोजणी झाली असून, संयुक्त मोजणीअंती १८१.१२.२५ हे.आर खाजगी क्षेत्रास कलम ३२(१) लागू करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रासाठी जमीन संपादित करण्यात आलेल्या संबंधित शेतकऱ्यांना रुपये ७० लक्ष प्रती हेक्टर दराप्रमाणे मावेजा वाटप करण्यात आला आहे.

जयपूर औद्योगिक क्षेत्रातील विकास कामाचा कार्यरंभ आदेश दिनांक २१/०१/२०२२ रोजी मऔवि महामंडळामार्फत देण्यात आला आहे. तथापि, फळझाडे व घरांचा मावेजा न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी दिनांक २२/०४/२०२२ पासून विकास कामास विरोध केला आहे.

त्याअनुषंगाने भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद यांचा फळझाडे व घराबाबतचा मुल्यांकन अहवाल फेरतपासणी करुन निधी मागणीसह दिनांक १३/१२/२०२२ रोजी मऔवि महामंडळास प्राप्त झाला आहे. त्यानुसार मुळ संयुक्त मोजणीनुसार संपादित जमिनीवरील फळझाडे, घरे, विहीरी बाबतचा मावेजा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही मऔवि महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यावृत्तीचा लाभ देण्याबाबत

**(१४) * १७३३० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील १८ हजार ९०२ विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शासनाच्या राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीपासून वंचित असल्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे विशिष्ट जाती/प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबवली जात नाही.

या विभागाद्वारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेतंर्गत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकाचा देखील समावेश आहे.
(२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एकूण ३,९१,१९८ इतके अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ३,८१,०६२ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली असून, १०,१३६ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करणे बाकी आहे. त्यासाठी निधी वितरित करण्यात आला असून, शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना दहावीपूर्व शिष्यवृत्ती पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१५) * १७५५२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकडून दहावीपूर्व (प्री मॅट्रिक) शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरुन प्रमाणित केल्यानंतर शिक्षण संचालक (योजना) यांनी सदरहू अर्ज फेटाळण्याच्या सूचना दिल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील १२ लाख ८३३ अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करण्यात आल्यामुळे पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळणारी दहावीपूर्व (प्री मॅट्रिक) शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणे बंद होऊन विद्यार्थी आणि पालकांची आर्थिक अडचण निर्माण होऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शिष्यवृत्ती सुरु ठेवण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने मत व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची दहावीपूर्व (प्री मॅट्रिक) शिष्यवृत्ती पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक समाजातील इ. १ ली ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी लागू असलेली प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाच्या दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये इयता १ ली ते ८ वी वगळून इयत्ता ९ वी व १० साठी मर्यादीत ठेवण्यात आली आहे.

सबब, केंद्राच्या दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार इयता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज परस्पर फेटाळण्यात आले आहेत.

(४) इयता १ ली ते ८ वी मधील विद्यार्थांची शिष्यवृत्ती पुर्ववत सुरु रहावी याकरिता शासनाच्या दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चार्मोशी-हरणघाट (जि.गडचिरोली) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) * १७५३७ श्री.रामदास आंबटकर : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक १०९४६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चार्मोशी ते हरणघाट (जि.गडचिरोली) नदीपर्यंतचा रस्ता पूर्णत: खराब असल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या क्षतीग्रस्त झालेल्या १४ कि.मी. लांबी पैकी ६ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या कामास मंजुरी देऊन सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करुन काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने चार्मोशी ते हरणघाट येथील उर्वरित ७ कि. मी. रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर रस्ता क्षतीग्रस्त झाला हे खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्यांवर ३ कि.मी लांबीत डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर रस्त्यांवर ३.३३० किमी लांबीत मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहे. उर्वरित ७.०० कि.मी. लांबीमध्ये सीआरआयएफ योजनेंतर्गत मंजूर कामाच्या प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

उर्वरित लांबी सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर बी. एस्सी. (संगणकशास्त्र), बीबीए (बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन) व बीसीए (कॉम्प्युटर ॲप्लीकेशन) इ. पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत

**(१७) * १७६७० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर बी.एस्सी.(संगणकशास्त्र), बीबीए (बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन) व बीसीए (कॉम्प्युटर ॲप्लीकेशन) इ. पदवी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य स्वरुपात शिष्यावृत्ती मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामी शिष्यावृत्ती देणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना शिष्यावृत्ती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करावयाची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद / उच्च माध्यमिक शिक्षकांना उपशिक्षणाधिकारी व तत्सम वर्ग २ पदाच्या पदोन्नतीपासून वंचित ठेवल्याबाबत

**(१८) * १७२६९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवेतील अधिकारी वर्ग २, उपशिक्षणाधिकारी (गट- ब) या पदाच्या प्रवेश नियम, २०२२ नुसार राज्यातील जिल्हा परिषद/उच्च माध्यमिक शाळेत कार्यरत शिक्षकांना उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदावर पदोन्नतीचा अधिकार दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या अधिसूचनेने नाकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिसूचना रद्द करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे. विभागामध्ये प्रशासन शाखा व शिक्षण सक्षमीकरण शाखा कार्यरत असून प्रशासन शाखेच्या उपशिक्षणाधिकारी संवर्गातील शैक्षणिक पदे (राजपात्रित मुख्याध्यापक ३५६ पदे) ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्यास वित्त विभाग व ग्रामविकास विभागाची मान्यता प्राप्त

झाली आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षकांना प्रशासन शाखेतील पदावर पदोन्नती ऐवजी त्यांच्या अनुभवाचा योग्य रीतीने वापर करुन घेण्यासाठी ग्रामविकास विभागाकडील सदर पदांवर व शिक्षण विभागातील सक्षमीकरण शाखेमध्ये पदोन्नतीच्या संधी देण्याबाबत विचार सुरु आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत

**(१९)** * **१७९०४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी, मुंबई येथे विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी मायबोली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अद्यापपर्यंत केलेल्या पाठपुराव्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यास केंद्र शासनाने प्रतिसाद दिला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.
(२) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून सचिव / प्रधान सचिव, मुख्य सचिव, मा.मंत्री, मराठी भाषा, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे स्तरावर केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा / पत्रव्यवहार सुरू आहे.

तसेच दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिनाचे' औचित्य साधून, सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी शिफारस करणारा" शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला आहे.
(३) होय.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणेबाबत या प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०३/११/२०१६, दिनांक ०८/१२/२०१६, दिनांक १६/०५/२०१९ व दिनांक २०/१०/२०२० च्या पत्रान्वये राज्य शासनास प्रतिसाद दिला आहे. तसेच केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक २०/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ञ समितीमार्फत विचाराधीन असल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षकांची फसवणूक केल्याबाबत

**(२०) * १८०९१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षक पात्रता परीक्षा मंडळाशी संगनमत करुन उक्त संस्थेत नियुक्त करण्यात आलेल्या ३० ते ३५ शिक्षकांकडून पैसे घेऊन त्यांना निकाल दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदाधिकाऱ्यांनी सदरहू निकाल देऊन शिक्षणाधिकारी यांची वेतन मान्यता घेवून वेतन काढले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक पात्रता परिक्षेत (टीईटी) झालेल्या गैरव्यवहारांमध्ये उक्त शिक्षकांचे निकाल बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने सदरहू सर्व शिक्षकांची संस्थेतील पदाधिकाऱ्यांकडून फसवणूक झाली असून त्यांचे वेतनही थांबविण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुषंगाने बोगस निकाल देऊन शिक्षकांची फसवणूक करणाऱ्या सदरहू संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर व परीक्षा मंडळाच्या संबंधित दोषी अधिकारी /कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) मराठवाड्यात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या एकूण १४ शाळा कार्यरत असून, यामधील १७ शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उघडकीस आलेल्या गैरव्यवहारात दोषी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यापैकी ४ शिक्षक विनाअनुदानित तत्वावर कार्यरत असून, त्यांना कोणतेही वेतन अनुदान अदा करण्यात आलेले नाही. तसेच उर्वरित १३ शिक्षकांचे वेतन बंद करण्यात आले होते. परंतु याबाबत मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार वेतन सद्य:स्थितीत सुरु आहे. प्रस्तुत प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घडा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२१) * १८३४१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घडा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारतीची गत दोन वर्षांपासून दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या नवीन वर्ग खोल्या अद्यापही बांधण्यात आल्या नसल्याने घडा व शिवारखेडा येथील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे विद्यार्थी शाळेच्या आवारात शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्राथमिक शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत तसेच नवीन वर्ग खोल्या बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

जि.प.प्राथमिक शाळा घडा येथील एक वर्गखोली क्षतीग्रस्त झाल्याने जून, २०२१ ला निर्लेखित करण्यात आली असून दुसरी वर्गखोली सुस्थितीत आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

जि.प. प्राथमिक शाळा घडा येथे बहुवर्ग अध्यापन पध्दतीने सद्य:स्थितीत असलेल्या वर्गखोली मध्ये अध्यापनाचे कार्य सुरळीत सुरु आहे. तसेच आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती, जिल्हा परिषद सेस फंड, सी.एस.आर.फंड, एस.एस.ए.फंड, वित्त आयोग, डी.एम.एफ.फंड, खासदार/आमदार निधी इत्यादींच्या माध्यमांतूनही वर्गखोल्यांच्या बांधकामाची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे पेट्रोकेमिकल रिफायनरी प्रकल्प उभारण्याबाबत

**(२२) * १८४२५ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रस्तावित असलेल्या पेट्रोकेमिकल रिफायनरीची तीन भागात विभागणी करून विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल (वेद) या संस्थेने नागपूर मधील बुटीबोरी एमआयडीसी किंवा कुही येथील जागा योग्य असल्याबाबत दावा केला असून विदर्भात हा प्रकल्प उभारण्यात यावा, अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर मधील बुटीबोरी एमआयडीसी किंवा कुही येथील जागा भौगोलीकदृष्टया मध्यवर्ती ठिकाणी असून तसेच राष्ट्रीय सुरक्षा, रेल्वे व विमानतळाची सुविधा, गोसीखुर्दचे पाणी, समृध्दी महामार्ग, जवळच असलेला ड्राय पोर्ट आणि उपलब्ध असलेली जागा यांचा विचार करता नागपूर या प्रकल्पासाठी सर्वाधिक योग्य ठिकाण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदर्भात नागपूर येथे पेट्रोकेमिकल रिफायनरीचा प्रकल्प उभारण्यात आल्यास छोटे - मोठे उद्योग उभे राहून रोजगारही उपलब्ध होणार असल्याने हा प्रकल्प विदर्भ विकासाच्यादृष्टीने आर्थिक गुंतवणुकीकरीता महत्वपूर्ण असल्याने सदर प्रकल्प विदर्भात उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नागपूर येथे पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स प्रकल्प उभारण्याकरीता केंद्र शासनाची कंपनी इंजिनिअर्स इंडीया लिमिटेड (EIL) मार्फत व्यवहार्यता अहवाल (Techno Feasibility Report) तयार करण्याचे

प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापुर जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षकांचे वेतन नियमित मिळत नसल्याबाबत

**(२३) * १७६३३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापुर जिल्हा परिषदेच्या २७९५ शाळांवर ९१६० शिक्षक असून त्यांच्या वेतनासाठी ७४ कोटी रुपयांची आवश्यकता असून शासनाकडून ४५ कोटी रुपये प्राप्त होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आवश्यकतेपेक्षा कमी निधी प्राप्त होत असल्याने जिल्हा परिषदेच्या शिक्षकांचे वेतन दोन टप्प्यात दिले जात असून दुसऱ्या टप्प्यातील वेतनासाठी शिक्षकांना महिन्याच्या २५ तारखेपर्यंत वाट पहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापुर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांना शासन निर्णयानुसार नियमित वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही. सन २०२२-२३ अंतर्गत माहे मार्च, २०२२ ते फेब्रुवारी, २०२३ साठी जिल्हा परिषद सोलापूर यांना साधारणपणे प्रतिमाह रक्कम रुपये ७८.०७ कोटी इतका निधी नियमित वेतनासाठी वितरित केला आहे.
(२) व (३) वित्त विभागाने दरमहा वितरित केलेले अनुदान विभागाने आयुक्त (शिक्षण) कार्यालयाला वितरित केले आहे. "वितरित केलेले अनुदान केवळ नियमित वेतनासाठी असून यामधून अन्य कोणतेही देयके या अनुदानातून अदा करण्यात येऊ नये" असे स्पष्ट निर्देश संचालनालयाने दिले असतानाही काही जिल्ह्यांमध्ये कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, ७ व्या वेतन आयोगाचा १ ला, २ रा व ३ रा हप्ता, थकीत महागाई भत्ता व इतर थकीत देयके अदा करण्यात आली, त्यामुळे काही जिल्ह्यामधील शिक्षकांचे नियमित वेतन होऊ शकले नाहीत. ज्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद शिक्षकांचे वेतन झालेले नाही, त्या जिल्ह्यांमधील जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांच्यावर संचालनालय स्तरावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील समग्र शिक्षण अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ व त्यांना शासनसेवेत समकक्ष पदावर कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत

**(२४) * १७१२९ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.कपिल पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत (सर्व शिक्षा अभियान) राज्यात शालेय शिक्षण विभाग व प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई अंतर्गत विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर सुमारे ६००० कर्मचारी सन २००३ पासून मानधनाच्या दरानुसार करार पध्दतीने कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात दहा टक्के वाढ सुचविण्यात आली आहे तसेच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने मानधनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना वर्षातून एकदा मानधन वाढ दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चार वर्षांपासून या कर्मचाऱ्यांच्या मानधनात कोणतीही वाढ करण्यात आली नाही, त्यामुळे अल्प मानधनात स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अडचणीचे होत असल्याने या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी सातत्याने होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव सादर केला असून शासन स्तरावर प्रस्तावाची तपासणी सुरू आहे, तसेच सदर कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समकक्ष पदावर कायमस्वरूपी सामावून घेऊन समान काम समान वेतन लागू करण्याची मागणी समग्र शिक्षा करार कर्मचारी संघटना यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत तसेच त्यांना शासन सेवेत समकक्ष पदावर कायम स्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

समग्र शिक्षा या योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या मानधनाच्या दरानुसार करार तत्वावरील कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले जाते.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीचा सादर केलेला प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या अभ्यासकेंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

**(२५) * १७८९६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेने (Institute of Distance & Open Learning (IDOL) विद्यार्थ्यांना नोकरी करताना शिक्षण घेण्याचा पर्याय उपलब्ध करून दिलेला असला तरी अभ्यासकेंद्रांअभावी विद्यार्थ्यांना अडचणीचे होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणी सोडविण्यासाठी तसेच अध्ययन साहित्य घेण्यासाठी वारंवार विद्यापीठात येणे शक्य होत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या अभ्यासकेंद्रांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात याबाबत बातमी प्रसिध्द झाली होती.

मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेतर्फे (Institute of Distance & Open Learning (IDOL) विद्यार्थ्यांच्या सोयीकरीता चर्चगेट, ठाणे, कल्याण, रत्नागिरी आणि सावंतवाडी येथे विभागीय उपकेंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत. तसेच रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे या जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात १०० हून अधिक अभ्यासकेंद्रेही सुरू करण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे नाही.

उपकेंद्रात/ अभ्यासकेंद्रात विद्यार्थ्यांना अध्ययन साहित्य दिले जाते व वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. निकाल जाहीर झाल्यानंतर निकालाची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तात्काळ उपलब्ध करून दिली जाते. अभ्यासकेंद्रावरही गुणपत्रिका उपलब्ध केल्या जातात.
(३) मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार मुंबई विद्यापीठाच्या आयडॉल अभ्यासकेंद्रांची संख्या आणि व्याप्ती वाढविण्याची कार्यवाही मुंबई विद्यापीठस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अशासकीय अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) * १८४१३ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या विविध विभागांतील रिक्त पदे भरण्यासंदर्भातील ५० % पदभरतीचा शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे परंतु, सदर शासन निर्णय अशासकीय अनुदानित संस्थांसाठी नसला तरीही पदभरतीसाठी ५० % अट सर्वच अनुदानित संस्थांची रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेसाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार संबंधितास पत्र व्यवहार करुनही शासन निर्णयानुसार अशासकीय अनुदानित संस्थांमधील रिक्त पदे भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सरळसेवा कोटयातील ७५००० हजार रिक्त पदे भरण्याचा शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे त्याप्रमाणे अशासकीय अनुदानित संस्थांमधील पदभरतीसाठी वेगळा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, ज्या विभागांचा अथवा कार्यालयांचा सुधारित आकृतिबंध अंतिम झालेला आहे अशा विभाग/कार्यालयातील सरळसेवा कोटयातील १०० टक्के व वर्ग- ३ ची ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्याबाबत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच ही मंजूरी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांसाठी लागू करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशासकीय अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
प्रथम टप्प्यात ५० टक्के पदे भरण्यात येणार आहेत.
(२) शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांची रिक्त पदे शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीद्वारे पवित्र पोर्टलमार्फत भरण्यासाठी दिनांक २२/०२/२०२३ ते दिनांक ०३ मार्च, २०२३ या कालावधीत परिक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.
(३) असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला नाही.
(४) व (५) सदर शासन निर्णयातील तरतूदी शासकीय कार्यालयांना लागू आहेत.
शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकांची पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रास्त भाव दुकानांमधील ई-पॉस मशीनमध्ये ५G सिम कार्डच्या माध्यमातून सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरळीत करण्याबाबत

**(२७) * १७३०४ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधार कार्ड संलग्नित करुन तसेच त्यांचे अंगठे / बोटे ई-पॉस मशीनवर प्रमाणित करून धान्य वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु माहे ऑक्टोबर, २०२२ पासून ई-पॉस मशीनमध्ये ३.३ चे वर्जन देण्यात आल्यामुळे अन्नसुरक्षा कायदा व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना या दोन्ही योजनांतील धान्य वितरण वेगळे केल्यामुळे एका शिधापत्रिकाधारकांकडून दोनवेळा अंगठा प्रमाणित केले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाकडून ए.पी.एल, बी.पी.एल, अंत्योदय, पी.एच.एच या शिधापत्रिकाधारकांना रास्तभाव दुकानामध्ये गहू, तांदुळाचे वितरण केले जात असून ए.पी.एल शिधापत्रिकाधारकांना रास्तभाव दुकानामध्ये अनेक वेळा ई-पॉस मशीनवर अंगठ्याची नोंद होत नाहीत, असे सांगत दुकानदार धान्य देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यातील सर्व्हरवर अतिरिक्त भार वाढला असून, सद्य:स्थितीत आपल्या राज्यात ४G आणि ५G आले असल्याने कालबाह्य झालेल्या तंत्रज्ञानाऐवजी रास्तभाव दुकानदारांकडील नवीन मशीन मध्ये ५G सिमकार्डच्या माध्यमातून ही व्यवस्था सुरळीत करण्याचे धोरण राज्य शासन अवलंबविणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील रास्तभाव दुकानदार अल्प कमिशन दरावर धान्य वाटपाचे कार्य करीत असून इतर राज्यांप्रमाणे रास्तभाव दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने नवीन मशीन मध्ये ५G सिमकार्डच्या माध्यमातून ही व्यवस्था सुरळीत करण्याबाबत तसेच रास्त भाव दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय खरे आहे, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) तसेच प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना (PMGKAY) अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याचे कोणत्याही अडचणी व संदिग्धतेशिवाय वितरण होणे आवश्यक आहे. NFSA/PMGKAY योजनांतर्गत अनुज्ञेय अन्नधान्याबाबत जागरुकता नसणे किंवा दोन्ही योजनांतर्गत अनुज्ञेय अन्नधान्य एकाच व्यवहारात (Single Transaction) केल्यामुळे लाभार्थ्यामध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे केंद्र शासनाच्या निदर्शनास आले. त्यानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना (PMGKAY) योजनेचे धान्य स्वंतत्र ePOS व्यवहाराद्वारे वितरित करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक २९/०७/२०२२ व दिनांक ०५/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत लाभार्थ्यांना स्वंतत्र आधार प्रमाणिकरण करून अन्नधान्याचे वितरण करण्यात आले.

(२) अंशत: खरे आहे, राज्यात दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ पासूनची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांचे अंत्योदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब लाभार्थी (PHH) अशा दोन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत असून ए.पी.एल. शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत नाही.

(३) हे खरे आहे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानांत नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता दिनांक ०१/०७/२०२२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता ३ System Integrators यांची निवड करण्यात आली असून सदर System Integrators यांना Work Order देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. मान्यतेनंतर रास्तभाव दुकानदार यांना लवकरात लवकर नवीन ४G तंत्रज्ञान व Iris Scanner या तंत्रज्ञान असणाऱ्या मशीन उपलब्ध करून देण्यात येतील.

(४) हे खरे नाही, सन-२०१७ मध्येच रास्तभाव दुकानदारांना देण्यात येणाऱ्या मार्जिनची रक्कम रुपये ७०/- प्रति क्विंटल वरून रुपये १५०/- प्रति क्विंटल वाढविण्यात आली आहे. यामध्ये केंद्र शासनाकडून रुपये ४५/- व राज्य शासनाकडून रुपये १०५/- असे एकूण रुपये १५०/- इतके मार्जिन रास्तभाव दुकानदारांना दिले जाते.

(५) सन २०२१ मध्ये रास्तभाव दुकानदारांना कमिशनची रक्कम रुपये १५०/-प्रति क्विंटलवरून रुपये २५०/-प्रति क्विंटल मिळण्याकरिता प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता.परंतु गोवा राज्य वगळता राजस्थान, तेलंगणा आणि गुजरात राज्यात देण्यात येणारे मार्जिनचे दर सध्याच्या महाराष्ट्र राज्याच्या सर्वासाठी समान असलेल्या दरापेक्षा कमी असून वस्तुनिहाय/बाबनिहाय वेगवेगळे आहेत. तसेच, कोव्हीड-१९ या महामारीच्या प्रादुभार्वामुळे राज्याच्या महसूलावर प्रतिकूल परिणाम झालेला असल्याने वित्त विभागाने या प्रस्तावास सहमती दर्शविलेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाळूंज, चिकलठाणा एमआयडीसी (जि.औरंगाबाद) येथील उद्योगधंद्यांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * १७११० श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १५९२२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळूंज (औरंगाबाद) औद्योगिक वसाहतीत नवीन युनीट सुरु करण्यासाठी भूखंड शिल्लक नसून ऑरीक सिटीमध्ये लघुउद्योजकांना आर्थिकदृष्टया भूखंड घेणे परवडत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिकलठाणा एमआयडीसी हा भाग उद्योग, व्यावसायिक व निवासी झाल्याने येथे नवीन उद्योग येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाळूंज औद्योगिक वसाहतीमध्ये भूखंड शिल्लक नसल्यामुळे लघु उद्योजक वाळूंज परिसरातील खाजगी जमिनीवर उद्योग उभारत आहेत, परंतु त्यांना एमआयडीसीकडून कोणत्याच सोयी सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाळूंज औद्योगिक परिसरातील खाजगी गटांमधील उद्योगांना चांगल्या दर्जाची वीज उपलब्ध करून देणेसाठी सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेमध्ये ३३/११ के.व्ही. तीसगाव व साजापूर उपकेंद्रे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वाळूंज परिसरात सिडकोमार्फत बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत शिवाय वाळूंज परिसरात मोठ्या प्रमाणावर जमिनी उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी अतिरिक्त एमआयडीसी उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

वाळूंज औद्योगिक क्षेत्रात ११३८९ चौ.मी. क्षेत्राचे औद्योगिक भुखंडात रुपांतरण करण्यात आले असून त्यापैकी ६००० चौ.मी. जागेचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वाटप करण्यात आले आहे. आजमितीस ५३८९ चौ.मी. औद्योगिक क्षेत्र वाटपास उपलब्ध आहे.
(२) हे खरे नाही.

चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रात २१,११५ चौ.मी. क्षेत्राचे औद्योगिक भुखंडात रुपांतरण करण्यात आले असून भूखंड वाटपास उपलब्ध आहेत. सदर जागेकरीता प्राधान्य सदराखाली जागा मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या औद्योगिक क्षेत्रास महामंडळातर्फे सर्व पायाभूत / मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्यानुसार वाळूंज औद्योगिक क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे सर्व पायाभूत / मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. वाळूंज औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीबाहेरील खाजगी जमिनीवर कार्यरत उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत मूलभूत सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सिडको वाळूज प्रकल्प हा भूधारक व सिडको यांच्यामध्ये ७५:२५ प्रमाणात भागीदारी प्रकल्प आहे. वाळूंज प्रकल्पात नगर १, नगर २ व नगर ४ मधील ३६२ हे. आर. क्षेत्राची संपादन कार्यवाही पूर्ण झाली आहे.

अतिरीक्त वाळूंज औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याच्या दृष्टीने मौजे साजापुर, करोडी, धरमपुर येथे संपादित केलेले क्षेत्र शेतकऱ्यांच्या विरोधामुळे व जमिनीच्या भावाची अवाजवी मागणी केल्यामुळे विनाअधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजे शरणापूर, वंजारवाडी, करोडी, धरमपुर येथील प्रस्तावीत औद्योगिक क्षेत्र विनाअधिसूचित करण्यात आले आहे.

वाळूंज औद्योगिक क्षेत्राच्या लगत भूसंपादनाची कोणतीही कार्यवाही सद्यःस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत प्रस्तावित नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(२९) * १७५५६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तासिका तत्त्वावरील नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनाने संचालक उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या नेट-सेट, एम.फील, कॅस, पीएचडी वेतनवाढ प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधन यांसारख्या इतर विविध प्रश्नांसाठी संचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीने प्राध्यापकांच्या प्रलंबित प्रश्नासाठी केलेल्या शिफारशीचे स्वरुप काय आहे,तसेच सदर समितीने तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या बाबत केलेल्या शिफारशीनुसार दरमहा मिळणाऱ्या मानधनात वाढ आणि इतर सर्व शिफारशींची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अहवालाच्या शिफारशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सदर समितीच्या शिफारशी या महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या नेट-सेट, एम.फिल, कॅस, पीएच.डी वेतनवाढ, प्राध्यापक भरतीचा प्रश्न यासंदर्भातील नाहीत. समितीने तासिका तत्वावरील अध्यापकांच्या संदर्भात शिफारशी केल्या असून त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(३) सदर समितीने अहवालात तासिका तत्वावरील अध्यापकांच्याबाबत प्रामुख्याने पुढील शिफारशी केल्या आहेत:-

मानधनात वाढ करणे, मानधन दरमहा थेट बँक खात्यात जमा करणे, शिल्लक कार्यभारावर तासिका तत्वावर नेमणूक देणे, तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता धारण केली असणे, तासिका तत्वावर केलेल्या सेवेचे अनुभव प्रमाणपत्र देणे, तासिका तत्वावर नियुक्ती करण्यासाठी कालबध्द कार्यपध्दती विहित करणे, परीक्षा विषयक पर्यवेक्षणाचे व मुल्यांकनाचे कामकाज देणे, पुनर्नियुक्ती करताना नव्याने निवड कार्यपध्दती राबवू नये, प्रचलित आरक्षण धोरणानुसार तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करणे.

समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरीता कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. तसेच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुकंपा तत्त्वावरील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समायोजनाबाबत

**(३०) * १७२६८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुकंपा तत्त्वावरील शिक्षकेतर कर्मचारी यांचे समायोजन करणेबाबतचे आदेश मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही जिल्ह्यांमधे समायोजनाची अंमलबजावणी अद्यापी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अनुकंपा तत्वावरील शिक्षकेतर कर्मचारी यांचे समायोजन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) अनुकंपातत्वावरील नियुक्ती ही नवीन पदभरती नसते किंवा ही नवीन पदनिर्मिती नसते, त्यामुळे या नियुक्तीवर कोणत्याही पदभरती बंदीचा वा आकृतिबंध निश्चित नसल्याचा प्रभाव पडत नाही, असे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्रमांक ४२१९/२०१८ मध्ये मा.न्यायालयाने निरीक्षणे नोंदविली आहेत.

त्याअनुषंगाने अनुकंपा नियुक्तीबाबत प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना शासनपत्र दिनांक १४/०९/२०२२ अन्वये संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संचालक (माध्यमिक) यांनी दिनांक १५/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिपरा (ता.तुमसर, जि.भंडारा) गावातील धान खरेदी केंद्रामध्ये ठेवण्यात आलेले धान्य वाहून गेल्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(३१) * १८०७६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिपरा (ता.तुमसर, जि.भंडारा) गावातील धान खरेदी केंद्र संत रविदास संस्थेमध्ये ठेवण्यात आलेले रुपये ३ कोटी ९५ लक्ष इतक्या रकमेचे धान्य माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या पुरामध्ये वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहून गेलेल्या धान्याबाबतच्या सादर केलेल्या अहवालाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी मा.मंत्री, सहकार व पणन, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिपरा (ता.तुमसर, जि.भंडारा) गावात पुरजन्य परिस्थिती निर्माण झाली नसतानाही तसेच सदर धान खरेदी केंद्र हे उंच डोंगराळ भागात असूनही तलाठी व निरीक्षक अधिकारी यांच्यामार्फत आपत्तीदर्शक पंचनाम्यात ५१ हजार धान पोते वाहून गेल्याची तसेच ४ हजाराहून अधिक धान सडल्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिपरा (ता.तुमसर, जि.भंडारा) गावात पूर परिस्थिती नसतानाही धान खरेदी केंद्रामध्ये धान्य वाहून गेल्याप्रकरणी चुकीचा अहवाल सादर केलेल्या धान खरेदी केंद्रावर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दिनांक १३/०९/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकरणी तहसिलदार, तुमसर व जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल जिल्हाधिकारी, भंडारा यांना सादर केला आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

उक्त प्रकरणी संबंधित तलाठ्यांनी तसेच तत्कालिन जिल्हा पणन अधिकारी यांनी केलेल्या चुकीच्या दिशाभूल करणाऱ्या पंचनाम्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केलेली आहे. तसेच संबंधित धान खरेदी संस्थेच्या संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले असून, सदर संस्थेचे धान खरेदीचे काम रद्द करण्यात आले आहे. सदर संस्थेस कायमस्वरुपी काळ्या यादीमध्ये टाकण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसाठी तज्ञांची समिती स्थापन करण्याबाबत

**(३२) * १७८९८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १२०५७ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तमिळ, संस्कृत, तेलगु, कन्नड, मल्याळम आणि उडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यापूर्वीच या भाषांची स्वतंत्र विद्यापीठे त्या त्या राज्यांत अस्तित्वात आली असतानाही राज्यात मात्र मराठी भाषा विद्यापीठ अद्यापही स्थापन झाले नसल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी भाषा विद्यापीठ उभारण्यासाठी भाषा सल्लागार समितीच्या शिफारसी आणि ठरावाचा आढावा घेवून पुढील कार्यवाही करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्याची घोषणा शासनाने करूनही अद्यापही सदर समिती स्थापन करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात मराठी भाषा विद्यापीठ उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे;

(२) व (३) राज्यात मराठी भाषा विद्यापीठ उभारण्याबाबत शासनस्तरावर समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकांना मानधनाऐवजी वेतन अनुदान मंजूर करण्याबाबत

**(३३) * १७३०३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५९४२ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागांतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील (१०+२) माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयासाठी नियुक्त मान्यताप्राप्त शिक्षकांना अनुदान मंजूर केले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या सुधारित पत्रानुसार माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाकरिता १२३ मान्यताप्राप्त शिक्षक असून त्यांच्या वेतनासाठी लागणारी वार्षिक आर्थिक तरतूद केवळ १० कोटी ८ लाख रुपये इतकी होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकांना वेतनश्रेणीनुसार अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून या विषयासाठी

नियुक्त केलेल्या शिक्षकास दरमहा रुपये ५०००/-, अर्धवेळ शिक्षकास रुपये २५००/- व घड्याळी तासावर नियुक्त शिक्षकास प्रति घड्याळी तास रुपये ५०/- इतके मानधन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने वेतन अनुदान मंजूर करण्याकरीता दिलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

सदर शिक्षक मानधन तत्वावर कार्यरत आहेत.

(२) होय.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ३१/०१/२००२ अन्वये या विषयासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकास दरमहा रुपये ५०००/-, अर्धवेळ शिक्षकास रुपये २५००/- व घड्याळी तासावर नियुक्त शिक्षकास प्रति घड्याळी तास रुपये ५०/- इतके मानधन देण्यात येते. राज्यातील उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयास अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामगाव ते गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३४) * १७०९० श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामगाव ते गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील रस्त्याचे कामास सन २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊनही अद्यापपर्यंत सदर रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जामगाव, रघुनाथनगर, ममदापूर, आगरकानडगाव, बगडी, हैबतपूर येथील ग्रामस्थांना गंगापूर येथे जाण्यासाठी हाच रस्ता असल्याने तसेच रस्त्यात मोठमोठे खड्डे असल्याने गंगापूरला ये-जा करण्यासाठी नागरिकांना व वाहनांना अडचणीचे होत असून या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर रस्त्याचे अपूर्णावस्थेत असलेले काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत गंगापूर ते जामगांव लांबीतील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(३) सदरचे काम गंगापूर ते जामगांव या ५ कि.मी. लांबीत सद्य:स्थितीत ३ कि.मी. लांबीत डांबरीकरणाचे मंजूर काम प्रगतीत असून मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

उर्वरित २ कि.मी. लांबीत डांबरीकरणाच्या मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आली असून कार्यारंभ आदेश दिनांक ०६/०२/२०२३ रोजी देण्यात आले आहे. सदरचे काम माहे नोव्हेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टीईटी प्रमाणपत्रांना मुदतवाढ देण्यात आल्याबाबत

**(३५)** * **१७६८६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टीईटी प्रमाणपत्राची सात वर्षांची मुदत राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद यांच्या दिनांक ९ जून, २०२१ च्या पत्रान्वये आजीवन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टीईटी प्रमाणपत्रांना आजीवन मुदतवाढ असल्याने टीईटी नसलेल्या शिक्षकांना पुन्हा मुभा देणे व अपात्रांना पुन्हा सेवेत घेऊन पुन्हा संधी देणे, याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, सन २०१४-२०१५ च्या अगोदर केंद्रीय टीईटी पात्र उमेदवारांबाबत शासनाने निर्णय घेतला असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक २४/०८/२०१८ अन्वये, इयत्ता १ ली ते ८ वी शिक्षक पदावर दिनांक १३/०२/२०१३ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकास राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत प्राप्त करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्यथा सदर शिक्षकांच्या सेवा संपुष्टात करण्यात याव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे.

(३) व (४) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेल्या अर्हतेनुसार, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक १३/०२/२०१३ अन्वये इयत्ता १ ली ते ८ वी इयत्तेकरीता शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच त्यानुसार केंद्र शासनाद्वारे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण उमेदवार देखील पात्र आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.